गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162


YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ७२ वा ● सोमवार २९ जुलै २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 72 | Date : 29/07/2024 | blow Monday | Page 4 Price 4


## पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताचं खातं उघडलं

### मनू भाकरची कांस्यपदकाला गवसणी



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्लीः मनू भाकरने १० मीटर पिस्तुल नेमबाजीत कांस्यपदक जिंकले, नेमबाजीत भारताची पहिली महिला ऑलिम्पिक पदक विजेती ठरली. २००४ मध्ये सुमा शिरूरनंतर वैयक्तिक स्पर्धेत ऑलिम्पिक नेमबाजीच्या अंतिम फेरीत पोहोचणारी २० वर्षांतील पहिली भारतीय महिला ठरली. अटीतटीच्या लढतीत मनू भाकरने २२१.७ गुणांसह कांस्यपदक मिळवलं.मनू भाकरने १० मीटर्स एअर पिस्टल नेमबाजीच्या अंतिम फेरीत धडक मारली होती. । पान २ वर

## ‘दरडोई १८,००० डॉलरचे ध्येय ठेवा’

### विकसित भारतासाठी निती आयोगाची दृष्टिकोन पत्रिका जारी




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली : देशाला २०४७ पर्यंत विकसित व्हायचे असेल तर, मध्यम उत्पन्नाच्या सापळ्यातून स्वत:ची सुटका करून घेणे आणि त्यासाठी काळजीपूर्वक उपाययोजना आखणे आवश्यक आहे, असा सल्ला निती आयोगाने दिला आहे. शनिवारी गव्हर्निंग कौन्सिलची बैठक पार पाडल्यानंतर, आयोगाने रविवारी ‘व्हिजन फॉर विकसित भारत ॲट २०४७, ॲन ॲप्रोच पेपर’ नावाने दृष्टिकोन । पान २ वर

**विकसित भारताची आवश्यक गुणवैशिष्ट्ये**

**विकसित भारताची परिभाषा स्पष्ट करताना आयोगाने म्हटले आहे की, अशा भारतामध्ये दरडोई उत्पन्नासह विकसित देशांची सर्व गुणवैशिष्ट्ये असतील. सामाजिक, सांस्कृतिक, तंत्रज्ञानात्मक आणि संस्थात्मक वैशिष्ट्ये ही विकसित देशांच्या तोडीस तोड असतील. त्याचवेळी समृद्ध वारसा आणि ज्ञानाच्या आघाडीवर काम करण्याची क्षमता हे गुणधर्मही असतील.**



## विधानपरिषदेच्या नवनिर्वाचीत ११ आमदारांचा शपथविधी सोहळा संपन्न

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबईः विधानपरिषद निवडणुकीत निवडून आलेल्या नवनिर्वाचित सर्व ११ आमदारांचा शपथविधी सोहळा आज संपन्न झाला. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी नवनिर्वाचित सदस्यांना शपथ दिली. यावेळी विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे हेदेखील उपस्थित होते. विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी १२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. यामध्ये महायुतीचे ९ उमेदवार विजयी झाले. तर महाविकास आघाडीचे २ उमेदवार निवडणूक आले होते. तर शेकपाचे जयंत पाटील यांचा पराभव झाला होता. विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी १२ जुलै रोजी मतदान झाले होते. या निवडणुकीत महायुतीने ९ जागा जिंक्ल्या तर महाविकास आघाडीने २ जागा जिंकल्या होत्या, १२ उमेदवारांपैकी शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार मिलिंद नार्वेकर आणि जयंत पाटील यांच्यात नेमका कोण

**शपथ घेणाऱ्या आमदारांची नावे**

**✻ पंकजा मुंडे – भाजप**
**✻ योगेश टिळेकर – भाजप**
**✻ अमित गोरखे – भाजप**
**✻ परिणय फुके – भाजप**
**✻ सदाभाऊ खोत – भाजप**
**✻ भावना गवळी – शिंदे शिवसेना**
**✻ कृपाल तुमाने – शिंदे शिवसेना**
**✻ शिवाजी गर्जे – राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष**
**✻ राजेश विटेकर – राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष**
**✻ प्रज्ञा सातव – काँग्रेस**
**✻ मिलिंद नार्वेकर – उद्धव ठाकरे पक्ष**

विजयी होणार याची उत्कंठा लागून राहिली होती. अखेर, मिलिंद नार्वेकर यांच्या गळयात विजयाची माळ पडली असून शेकापच्या जयंत पाटील यांचा पराभव झाला आहे. या निवडणुकीत काँग्रेसची । पान २ वर

## ‘आनंदाचा शिधा’ योजनेत पारदर्शकता; ठराविक ठेकेदारांची मक्तेदारी संपुष्टात; ठेका मिळविण्यासाठी नऊ कंपन्या स्पर्धेत

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई: राज्य सरकारच्या सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि आनंदाचा शिधा योजनेवरील नागपुरी ठेकेदारांची मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी या योजनेच्या निविदा प्रक्रियेत बदल करण्याचा निर्णय सरकारला फायद्याचा ठरला आहे. या योजनेतील जाचक अटी दूर करण्यात आल्यामुळे यावेळी आनंदाचा शिधा पुरवठ्याचा ठेका मिळविण्यासाठी तब्बल नऊ कंपन्या स्पर्धेत उतरल्या आहेत. त्यामुळे सरकारचा निधी वाचण्यासोबतच लाभार्थ्यांनाही वेळेत आनंदाचा शिधा मिळण्याचा मार्ग सुकर झाल्याची माहिती मंत्रालयातील सूत्राने दिली.राज्यात गेल्या दोन वर्षांपासून सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अंत्योदय योजना व प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारक तसेच छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागातील सर्व जिल्हे तसेच नागपूर विभागातील वर्धा असा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेवरील (एपीएल) केशरी शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंबांसाठी ‘आनंदाचा शिधा’ ही योजना राबविली जात आहे. गणेशोत्सव, दिवाळी, रामनवमी अशा सणांचे औचित्य साधून राज्यातील सुमारे १ कोटी ७० लाख शिधापत्रिकाधारकांना आनंदाचा शिधा पुरविला जातो. प्रति शिधापत्रिका एक



शिधा जिन्नस संचाची खरेदी करण्यासाठी ५६२.५१ कोटी इतक्या खर्चास काही दिवसांपूर्वी मंत्रिमंडळाने मान्यता दिली असून विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर कोणत्याही परिस्थितीत गणेशोत्सवापूर्वी आनंदाचा शिधा लोकांना मिळायला हवा, असे अन्न व नागरी पुरवठा विभागास बजावण्यात आले आहे.

या योजनेवर नागपुरी पुरवठादार कंपन्यांची मक्तेदारी होती. या कंपन्यांनी निश्र्चित केलेल्या । पान २ वर

## आजपासून ३१ जुलैपर्यंत ६२ रेल्वे गाड्या रद्द

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : रेल्वे प्रवाशांसाठी मोठी आणि महत्वाची बातमी आहे. मध्य रेल्वेने पुणे विभागातील दौंडमध्ये नॉन इंटरलॉकिंगचे काम करण्यासाठी तीन दिवसांचा ब्लॉक जाहीर केला आहे. त्यामुळं २९ ते ३१ जुलैपर्यंत रेल्वेने तब्बल ६२ रेल्वे गाड्या रद्द केल्या आहेत. अनेक गाड्या पुणे-मिरज-कुर्डूवाडी, गुंताकल-बेल्लारी-हुबळी-मिरज-पुणे आणि मनमाड-इगतपुरी-कल्याण-पनवेल-कर्जत-पुणे-मिरज या मार्गांऐवजी पर्यायी मार्गावर चालवल्या जातील.

२९ जुलै रोजी रद्द करण्यात आलेल्या रेल्वे गाड्या?

२९ जुलै रोजी १७६१४ हजूर साहिब नांदेड-पनवेल एक्सप्रेस, १७६१३ पनवेल-हजूर साहिब नांदेड एक्सप्रेस, १२०२५/१२०२६ पुणे-सिकंदराबाद-पुणे शताब्दी एक्सप्रेस, १२१६९/१२१७० पुणे-सोलापूर-पुणे एक्स्प्रेस, ११४०१९, ऊ१४०९ ऊ१४०० सोलापूर-पुणे एक्सप्रेस, ०१५११ /०१५१२ पुणे-बारामती-पुणे डीएमयू, ०१५२५ पुणे-दौंड एमएमयू, ०१४६१/०१४६२ सोलापूर-दौंड-सोलापूर डीएमयू, ०१५३९ -पुणे ऊ्वण, ०१५२८ बारामती-पुणे मु, ०१५३३ पुणे-दौंड ऊ्वण, ०१५३२ बारामती-दौंड ऊ्वण, आणि ०१४८७/०१४८८ पुणे-हरंगुळ-पुणे एक्स्प्रेस या रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत.

३० जुलै रोजी रद्द करण्यात आलेल्या रेल्वे गाड्या?

१४१७ पुणे-सोलापूर एक्सप्रेस, १७६१४ हजूर साहिब नांदेड एक्सप्रेस, १७६१३ पनवेल-हजूर साहिब नांदेड एक्सप्रेस, । पान २ वर



## जिल्हा परिषद शाळा गोगांव वतीने शिक्षण सप्ताह स्नेह भोजनानी सांगता

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः जिल्हा परिषद शाळा गोगांव वतीने शिक्षण सप्ताह निमित्त भव्य प्रभात फेरी काढण्यात आली.या प्रभात फेरीमध्ये पर्यावरण रक्षण पाण्याची बचत,शिक्षण,वृक्षतोड करू नका,जीवन धोक्यात टाकू नका या विषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी गावात प्रभात फेरी काढण्यात आली

या प्रभात फेरीमध्ये. झाडे लावा झाडे जगवा. पाणी अडवा पाणी जिरवा,निसर्गाचे रक्षण हेच खरे मूल्यशिक्षण, स्वच्छ गाव सुंदर गाव,मुलगा मुलगी एक समान द्यावे त्यांना शिक्षण छान एक एक अक्षर शिकूया ज्ञानाचा डोंगर चढूया. अक्षर कळे संकट टळे. राहू आपण एकोप्याने देश घडू या शिक्षणाने वाचाल तर वाचाल मूलभूत शिक्षण हक्क हाच मानवाचा खरा हक्क शाळेत राहू नका गैरहजर दररोज रहा हजर स्वच्छता पाळा रोगराई टाळा,पाण्याचे संरक्षण धरतीचे रक्षण इत्यादी घोषवाक्य असलेले फलक घेऊन शाळेच्या बँड पथकासह गावातून प्रभात फेरी काढण्यात आली. या प्रभात फेरीमध्ये जिल्हा परिषद शाळा मधील विद्यार्थी शिक्षक सहभागी झाले होते. मुख्याध्यापक दयानंद चोळे यांनी शिक्षण सप्ताह यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी आभार मानले शेवटी विद्यार्थ्यांना स्नेह भोजनाने शिक्षण सप्ताहाची सांगता झाली .कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्योती आलुरे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुधीर जगताप, किरण गायकवाड, यांनी केले

## दीक्षाभूमी येथून उस्फुर्त प्रतिसादात पत्रकार संवाद यात्रेला सुरुवात

### मताचे गठ्ठे पाहूनच न्याय मिळत असेल तर प्रत्येक पत्रकार एक गठ्ठा आहे: वसंत मुंडे



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नागपूर :दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रेला रविवारी (दि. २८) दीक्षाभूमी येथून राज्यभरातील पत्रकारांच्या प्रचंड प्रतिसादात सुरुवात झाली. यावेळी उपस्थित शेकडो पत्रकारांना मार्गदर्शन करताना, वसंत मुंडे म्हणाले, राज्यकर्ते मताचे गठ्ठे पाहूनच समाजातील विविध घटकांसाठी योजना जाहीर करत असतील तर या राज्यातला प्रत्येक पत्रकार मताचा गठ्ठा आहे. याचा विचार करून राज्यकर्त्यांनी पत्रकारांचे प्रश्र्न सोडवावेत असे आवाहन त्यांनी केले. दरम्यान, मंत्रालय विधिमंडळ वार्ताहार संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे यांनी हिरवा झेंडा दाखवल्यानंतर संवाद यात्रेला सुरुवात झाली.

नागपूर येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखालील बहुचर्चित राज्यव्यापी पत्रकार संवाद यात्रेला रविवारी (दि.२८ जुलै २०२४) सुरूवात झाली. लोकशाहीच्या बळकटीसाठी, पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी, हा संकल्प घेवून दीक्षाभूमी ते मंत्रालय या पत्रकार संवाद यात्रेच्या शुभारंभ प्रसंगी प्रदेश अध्यक्ष वसंत मुंडे, सरचिटणीस विश्र्वासराव आरोटे, मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे, माजी अध्यक्ष चंदन शिरवाळे,कार्याध्यक्ष प्रवीण सपकाळे, , राज्य समन्वयक संतोष मानुरकर,। पान २ वर

### संवाद यात्रेत राज्यभरातील पत्रकारांच्या गाड्यांचा ताफा

पत्रकार आणि सर्व स्तरातील माध्यम कर्मी यांचे प्रश्र्न घेऊन दीक्षाभूमी येथून मुंबईच्या दिशेने निघालेल्या संवाद रॅलीचा मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे चंदन शिरवाडे यांनी हिरवा झेंडा दाखवल्यानंतर रॅलीला सुरुवात झाली. संवाद यात्रेचा पहिला मुक्काम महात्मा गांधींची पावन भूमी वर्धा येथे आहे. सेवाग्रामकडे पत्रकार संवाद रॅली जात असताना राज्यभरातील शेकडो पत्रकार आपल्या वाहनांसह रॅलीत सहभागी झाल्याने रॅलीतील वाहनांची रांग अर्धा ते एक किलोमीटर एवढी झाली होती. पत्रकार रॅलीचा हा ताफा आणि त्यांची एकजूट राज्यकर्त्यांना नक्कीच विचार करायला भाग पाडणार पाडणार असल्याचा विश्र्वास यावेळी पत्रकार बांधव व्यक्त करत होते.

### ५० संघटनांचा पाठिंबा

दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रेच्या शुभारंभ प्रसंगीच राज्यभरातील वेगवेगळ्या सामाजिक आणि विचाराच्या संघटनांनी पत्रकार संवाद यात्रेला पाठिंबा दिला. विशेष म्हणजे राज्यातील अनेक आजी माझी लोकप्रतिनिधींनी पत्रकारांच्या प्रश्र्नाबाबत संवेदना दाखवत पत्रकारांच्या सोबत असल्याचे सांगितले.

## संपादकीय

### तरी पटलेले दिसत नाही.

औरंगजेबाशी काही देणे घेणे नाही. तो जिवंत असेपर्यंत त्याने महाराष्ट्राला म्हणजे शिवछत्रपतींना त्रासच दिला. चहूबाजूंनी घेरण्याचा प्रयत्न केला. दिल्लीमध्ये शिवरायांना कटकारस्थान करून बंदी बनविले. शिवाय या माणसाने स्वराज्यात अनेक अडथळे आणले, जनतेवर अत्याचार केले, मंदिरे जमीनदोस्त केली. त्यामुळे औरंगजेबाचे महाराष्ट्राने कौतुक करण्याचे काहीच कारण नाही. पण, खरा औरंगजेब १७०७ मध्ये मेला असला तरी आता आपल्या राजकीय नेत्यांनी त्याला थडग्यातून बाहेर काढले आहे. का, कशासाठी, यातून काय साध्य करायचे आहे, हे जनता जनार्दन जाणून आहे. तरीही औरंगजेबाची ह्व आठवण वारंवार का काढावी लागते, याचा विचार राजकीय नेत्यांनी जरूर करावा. किंबहुना, त्याची खूप गरज आहे. याला निमित्त ठरले आहे ते भाजपचे ज्येष्ठ नेते आणि देशाचे गृहमंत्री अमित शहा यांचे पुण्यातील वक्तव्य. भाजपच्या पुण्यातील अधिवेशनात विरोधकांवर तोफ डागताना शहा यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे औरंगजेब फॅन्स क्लबचे अध्यक्ष आहेत, असे वक्तव्य करून टाळ्या मिळवल्या. अमित शहांना आता औरंगजेबाची आठवण का झाली, हा भाग निराळा. पण, टीका करताना आपण कुणाचे नाव वारंवार ओठावर आणतो याचे भान राखायला हवे होते. जून २०२३ मध्ये बहुजन वंचित आघाडीचे प्रमुख ॲड. प्रकाश आंबेडकरांनी औरंगजेबाच्या कबरीवर फुले वाहिली आणि राज्यातील राजकारण पुन्हा तापले होते. त्यानंतर मुंबईत ठाकरे आणि प्रकाश आंबेडकर हात मिळवताना आणि मागे औरंगजेब असलेले होर्डिंग्ज लावण्यात आले होते. त्यानंतर औरंगजेबाचे स्टेटस ठेवण्यावरून महाराष्ट्रातील काही शहरांत गेल्या वर्षी जूनमध्ये प्रचंड तणाव निर्माण झाला होता. त्यावरून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी औरंग्यांची अवलाद, असा शब्दप्रयोग केला होता. तर भाजप नेते नीलेश राणे यांनी 'कधी कधी वाटते औरंगजेबाचा पुनर्जन्म म्हणजेच शरद पवार' असे ट्वीट करत नवा वाद निर्माण केला होता. मविआ सरकारने शेवटच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत औरंगाबाद शहराचे नाव 'संभाजीनगर' करण्याचा निर्णय घेतला होता. तर महायुती सरकार आल्यानंतर त्यांनी 'छत्रपती संभाजीनगर' असे नामकरण केले. शहराचे नाव बदलण्याचा निर्णय बाजूला ठेवला तरी राजकीय नेत्यांना औरंगजेब जिवंत का हवा आहे आणि औरंगजेबाचे भूत किती काळ त्यांच्या मानगुटीवर बसून राहणार आहे, याचे उत्तर जनतेला मिळायला हवे! कारण औरंगजेबाला कबरीतून बाहेर काढणे जनतेला तरी पटलेले दिसत नाही.

पान १ वरुन

## दीक्षाभूमी येथून उस्फुर्त प्रतिसादात ..

निलेश सोमाणी, महेश पाणसे, नितीन शिंदे,नयन मोढें, वैभव स्वामी यांच्यासह राज्यभरातील पत्रकारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होते. यावेळी पुढे बोलताना वसंत मुंडे म्हणाले, घटना लिहिण्यापूर्वी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे पत्रकार होते. बहिष्कृत भारत हे वर्तमानपत्र त्यांनी काढले. यामुळे महामानव बाबासाहेबांनी जिथे दीक्षा घेतली, त्या दीक्षा भूमीतूनच पत्रकार संवाद यात्रा काढायची असे ठरवले होते. महामानव बाबासाहेबांच्या पावन अशा दीक्षाभूमीला वंदन करून पत्रकार संवाद यात्रा पुढे जाणार आहे. आजपर्यंत पत्रकार सर्वसामान्य माणसाचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, प्रशासकीय, राजकीय प्रश्र्न शासन आणि प्रशासनाच्या दरबारात मांडत आले आहेत. सर्वसामान्य माणसाचा आवाज बनत आले आहेत. कायम लोकांचा आवाज बनत आलेल्या पत्रकारांवर आज स्वतःसाठी आवाज उठवण्याची वेळ आली आहे. कारण कोरोना महामारीनंतर पत्रकार ज्या आवस्थेतून जात आहेत. जे प्रश्र्न आणि संकटांचा सामना करत आहेत, त्याकडे कोणाचेच लक्ष नाही. पत्रकार हा समाजाचा एक घटक आहे, हे मानायला देखील राज्यकर्ते आणि प्रशासन तयार नाही. समाजातल्या प्रत्येक घटकासाठी शासनाच्या काही ना काही योजना आहेत. परंतु पत्रकारांसाठी कोणत्याच योजना नाहीत. पत्रकार समाजातला एक घटक असेल तर त्याच्यासाठी शासनाच्या योजना का नाहीत? हे विचारण्यासाठी ही पत्रकार संवाद रॅली आहे. सरकार विविध घटकांचे मतांचे गठ्ठे पाहून त्यांच्यासाठी विविध योजना जाहीर करत असेल तर सरकारने पत्रकारांचा मतांचा गठ्ठा किती मोठा आहे, हे देखील लक्षात घ्यावे, असे सांगत संवाद यात्रा जसजशी पुढे जाईल तसे लोकांचे मोठ्या प्रमाणात समर्थ मिळेल आणि राज्य सरकार पत्रकारांच्या प्रश्र्नाबाबत गंभीर बनेल, असा विश्र्वास वसंत मुंडे यांनी व्यक्त केला. पुढे बोलताना त्यांनी ही संवाद यात्रा पत्रकार, वृत्तपत्र विक्रेते, मालक, वर्तमान पत्रातील इतर कामगार यांना न्याय मिळवून देण्यासाठी असल्याचे शेवटी वसंत मुंडे म्हणाले. संवाद यात्रेत सर्व स्तरातील पत्रकारांनी सहभागी व्हावे असे आवाहनही त्यांनी केले.

दरम्यान, विश्र्वासराव आरोटे म्हणाले, पत्रकार संवाद यात्रेची संकल्पना प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांची होतीच, परंतु त्यांच्यात नेतृत्व आणि दातृत्व देखील आहे. संवाद यात्रा काढताना संघटनेच्या प्रत्येक पदाधिकाऱ्यांला वसंतराव यांनी विश्र्वासात घेतले. यामुळेच आज संवाद यात्रेच्या शुभारंभाला राज्यभरातील सर्व स्तरातील पत्रकारांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाल्याचे विश्र्वासराव आरोटे म्हणाले. तर संपादक संतोष मानुरकर म्हणाले, आजचा पत्रकार संवाद यात्रेचा शुभारंभ झालेला २८ जूलै हा दिवस महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवला जाणार आहे. ही यात्रा जेंव्हा मुंबई आणि मंत्रालयात जाईल तेंव्हा वसंतराव मुंडे हे राज्यभरातील पत्रकारांसाठी गोड बातमी देतील, असे मानुरकर म्हणाले. प्रास्ताविकात विभागीय अध्यक्ष प्रमोद शेंडे यांनी संवाद यात्रा मंत्रालयावर धडकल्यानंतर आपले प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे हे नक्कीच पत्रकारांसाठी काही ना काही घेवून येतील असा विश्र्वास व्यक्त केला. दीक्षाभूमी येथील पत्रकार संवाद यात्रेच्या शुभारंभ प्रसंगी राज्यभरातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय लोक अदालत यशस्वीपणे संपन्न

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे आदेशाप्रमाणे दि. २७ जुलै २०२४ रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे सोलापूर शहर व सर्व तालुक्यामधील न्यायालयात राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते.

या लोकन्यायालयाचे उद्घाटन राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांनी तयार केलेले एकमुठ्ठी आसमान या गीताने करण्यात आले. यावेळी मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, सोलापूर मो. सलमान आझमी, यांनी उद्घाटन प्रसंगी राष्ट्रीय लोकअदालत मध्ये जास्तीत जास्त प्रकरण मिटविण्यात यावे तसेच लोकअदालत मध्ये प्रकरण तडजोडी करून मिटविल्यास वादी व प्रतिवादी यांच्या मध्ये निर्माण झालेली द्वेष भावना सपुंष्टात येईल त्यामुळे एकमेकांबद्दल आदर निर्माण होईल यामध्ये दोन्ही पक्षाचा विजय होईल चलनक्षम दस्तावेज मधील प्रकरण लोक न्यायालयामध्ये मिटविल्यास वादीस पुर्णपणे न्यायालय मुद्रांक परत मिळेल पक्षकार यांचा वेळ, पैसा, श्रमही वाचेल असे प्रतिपादन केले. सदर उद्घाटन प्रसंगी पॅनलवरील सर्व न्यायिक अधिकारी, पी. एस. खुणे, जिल्हा न्यायाधीश-२. महाराष्ट्र व गोवा बार कॉन्सिलचे सदस्य श्री. मिलिंद थोबडे, जिल्हा सरकारी वकील श्री प्रदीपसिंह रजपूत, सोलापूर विधिज्ञ संघाचे अध्यक्ष श्री अमित आळंगे, विधिज्ञ संघाचे सर्व पदाधिकारी, सौ. पल्लवी पैठणकर जिल्हा न्यायालयाचे प्रबंधक , लोकअभिरक्षक कार्यालयातील सर्व विधिज्ञ, तसेच जिल्हा न्यायालय सोलापूर कर्मचारी उपस्थित होते.

लोक न्यायालयामध्ये जिल्हयात एकूण ३९ पॅनल निर्मिती करण्यात आली होती. सदर लोक न्यायालयामध्ये दिवाणी, फौजदारी, मोटार वाहन प्रकरणे, भुसंपादन, दरखास्त व कलम १३८ चलनक्षम कायदयाची तसेच कौटुंबिक वाद वगैरेची न्यायप्रविष्ट प्रकरणे व तसेच बँका, टेलिफोन कंपनी, विविध वित्तीय संस्था यांची दाखलपूर्व प्रकरणे

तसेच वाहतुक शाखा, सोलापूर ई-चलन प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. लोक न्यायालय हे प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर सलमान आझमी, व दिवाणी न्यायाधीश व स्तर तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर उमेश देवर्षी यांच्या मार्गदर्शनाखाली व वकिल संघटना व पक्षकार यांचे सहकार्याने संपन्न झाले.

लोक अदालतीमध्ये १ लाख २२ हजार ९०६ प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती, त्यापैकी ७ हजार ८७ प्रलंबित प्रकरणात तडजोड झाली व ४ हजार ३२६ दाखलपुर्व प्रकरणे असे एकूण ११ हजार४१३ आपापसात तडजोडीने निकाली काढण्यात आली. व रु ११४४५६२८३४/- (अक्षरी एकशे चौदा कोटी पंचेचाळीस लाख बासष्ठ हजार आठशे चौतीस एवढया रकमेची तडजोड करण्यात आली. या लोक अदालाती मध्ये शहर वाहतूक व ग्रामीण शाखा सोलापूरचे ई-चलनद्वारे २० लाख ५५ हजार इतकी रक्कम वसूली झाली. सोलापूर जिल्हा न्यायालयातील पॅनलवर न्यायाधीश वाय. ए. राणे, श्रीमती, जे. एम. काकडे, एस. डी. गावडे, पी. पी. पेठकर, डी. आर. भोला, व्ही. एम. रेडकर, एस. आर. सातभाई, डी. जी. कंखरे, एस. पी. पाटील, व्ही. पी. कुंभार, श्रीमती एम. के कोठुळे श्रीमती एम. पी. मर्डेकर, श्रीमती व्ही. ए. कुलकर्णी या न्यायीक अधिकाऱ्यांनी काम पाहिले. तसेच पॅनल सदस्य म्हणून लोकअभिरक्षक कार्यालयातील विधिज्ञ सौ स्नेहल राऊत, झुरळे, सोलनकर, रेवण पाटील, नवले, म्हेत्रे, श्रीमती किणगी तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण पॅनलवरील कुर्ले व श्रीमती मोरडे यांनी काम पाहिले.

**स्पेशल ड्राईव्ह** लोकन्यायालयाच्या अगोदर मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ५ दिवस स्पेशल ड्राईव्ह प्रत्येक प्रथम न्यायदंडाधिकारी न्यायालयात मेण्यात आला. सोलापूर जिल्हयामध्ये सदर पाच दिवसांमध्ये ३४४२ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

### लोकन्यायालयाची मुद्देसूद माहिती खालीलप्रमाणे :

प्रलंबित प्रकरणे- एकूण ठेवलेली प्रलंबित प्रकरणे ५७०१२.
एकूण तडजोड झालेली प्रलंबित प्रकरणे ७०८७
प्रलंबित प्रकरणातील तडजोड रक्कम ९६५८०३३९३/-
दाखलपूर्व प्रकरणे- एकूण ठेवलेली दाखलपूर्व प्रकरण ६५८९४,
एकूण तडजोड झालेली दाखलपूर्व प्रकरणे ४३२६
दाखलपूर्व प्रकरणातील तडजोड रक्कम- १७८७५९४४१/ .
ऑनलाईन व व्हॉट्सअप (आभासी पध्दतीने) तडजोड प्रकरणे २८
.तडजोड झालेली वैवाहिक प्रकरणे ४६




### तालुका निहाय प्रकरणांची माहिती

तालुका विधी सेवा समितीचे नांव- सोलापूर - एकूण तडजोड प्रकरणे -५०८६ तडजोड रक्कम -३७२८६८१६८

अक्कलकोट- एकूण तडजोड प्रकरणे-७८३, तडजोड रक्कम- १२२५९३७५, बार्शी- एकूण तडजोड प्रकरणे-२१५५, तडजोड रक्कम- २६३७१५२४५. माढा- एकूण तडजोड प्रकरणे-८४८ , तडजोड रक्कम -२३९४४७१८ . मोहोळ- एकूण तडजोड प्रकरणे -१५४ , तडजोड रक्कम -२६५६५४०७ . माळशिरस - एकूण तडजोड प्रकरणे -१०३३, तडजोड रक्कम-५९९८७४१७ . मंगळवेढा- एकूण तडजोड प्रकरणे-१५० , तडजोड रक्कम -३२९२९७६९. पंढरपूर-तडजोड प्रकरणे-१६४ ,तडजोड रक्कम -६१८८०६५४ . करमाळा- तडजोड प्रकरणे -२५७ , तडजोड रक्कम -६४०५४८३४ . सांगोला - तडजोड प्रकरणे-७८३ ,तडजोड रक्कम -१०८५७२४७. तसेच सदरची लोक अदालत यशस्वी करण्याकरिता जिल्हा न्यायाधीश श्री आर जे कटारिया, मुख्य न्याय दंडाधिकारी श्री विक्रमसिंह भंडारी, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर श्री शंतनु जहागीरदार,धर्मदाय उपायुक्त श्री प्रवीण कुंभोजकर, न्यायाधीश श्रीमती दीप्ती कोळपकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. अशी माहिती अधिक्षक जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर एस.ए.जी.नदाफ यांनी दिली.

## 'आनंदाचा शिधा' योजनेत पारदर्शकता

अटी- शर्तींनुसार निविदा प्रक्रिया राबविली जात होती. त्यामुळे अन्य कोणत्याच पुरवठादारास या निविदा प्रक्रियेत सहभागी होता येत नसे. परिणामी दोन- तीन कंपन्या संगनमताने विभागनिहाय आनंदाचा शिधा पुरवठ्याचे कंत्राट मिळवत होत्या. आणि सरकारलाही १०० रुपयांच्या एका पॅकेटसाठी सुमारे ३०० ते ३५० रुपये मोजावे लागत होते. शिवाय सणावाराला आनंदाचा शिधा मिळत नसल्याने या योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या अन्न व नागरी पुरवठा विभागास लोकप्रतिनिधी आणि जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागले होते.राष्ट्रवादीच्या ज्येष्ठ नेत्यांनी या योजनेत पारदर्शकता आणतानाच लोकांना वेळेत आनंदाचा शिधा मिळावा यासाठी निविदा प्रक्रियेतील जाचक अटी दूर करण्याची सूचना केली होती. त्यानुसार विभागाने या योजनेसाठी किमान १५० कोटींच्या कामाचा अनुभवाची अट शिथिल करताना आता केवळ २५ कोटींच्या कामाचा अनुभव तसेच वितरण व्यवस्थेचा अनुभव असणाऱ्या ठेकेदारांनाही परवानगी देण्यात आली आहे. त्याचा फायदा घेत यावेळी नऊ कंपन्यांनी निविदा दाखल केल्या आहेत. त्यामुळे यावेळी निखळ स्पर्धा होईल अशी अपेक्षा असून उद्या सोमवारी या निविदा खुल्या केल्या जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

## विधानपरिषदेच्या नवनिर्वाचीत ११

८ मतं फुटल्याचं प्रथमदर्शन दिसून येत आहे. तर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या भाजप महायुतीचा वरचष्मा दिसून आला होता.

विधानपरिषद निवडणुकीत सुरुवातीपासूनच काँग्रेसची मतं फुटणार, अशी चर्चा होती. या निवडणुकीत अजित पवार गटाला दोन उमेदवार निवडून आणणे कठीण होते. त्यासाठी त्यांना अतिरिक्त मतांची गरज होती. विधानपरिषद निवडणुकीच्या मतमोजणीला सुरुवात झाल्यावर शिवाजीराव गर्जे आणि राजेश विटेकर यांनी पहिल्या पसंतीची २३ मतं मिळवत विजय मिळवला. त्यामुळे काँग्रेसची ८ मतं फुटल्याची जोरदार चर्चा आहे.

भाजपची यंग ब्रिगेड विधानपरिषदेत दिसणार आहे. भाजपचे योगेश टिळेकर, परिणय फुके, पंकजा मुंडे आणि अमित गोरखे यांचा विजय झाला. अमित गोरखेंच्या रूपानं मातंग समाजातील तरूण चेहरा विधानपरिषदेत दिसणार आहे. तर योगेश टिळेकर यांच्या माध्यमातून माळी समाजाला विधानपरिषदेत प्रतिनिधित्व मिळाले आहे. याशिवाय, सदाभाऊ खोत यांच्या रूपात शेतकरी आणि चळवळीत कार्यकर्ता पुन्हा आमदार झाला आहे.

## 'दरडोई १८,०००

पत्रिका जारी करण्यात आली.या पत्रिकेमध्ये भारताने उच्च उत्पादन गटामध्ये जाण्यासाठी कोणती पावले उचलणे आवश्यक आहे त्याचा ऊहापोह करण्यात आला आहे. ''अर्थव्यवस्थेचा विचार करता, विकसित राष्ट्र होण्यासाठी आपल्याला २०४७पर्यंत ३० ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था होणे आवश्यक आहे. त्यासाठी दरडोई १८ हजार डॉलर उत्पन्नाचे ध्येय गाठण्यासाठी प्रयत्न करावे लागतील.सध्याच्या ३.३६ ट्रिलियन अर्थव्यवस्थेत नऊपट तर आताच्या वार्षिक २,३९२ डॉलर दरडोई उत्पन्नात आठपट वाढ करावी लागेल,'' असे या पत्रिकेत नमूद करण्यात आले आहे. सध्याच्या मध्यम उत्पन्न गटातून उच्च उत्पन्न गटामध्ये जाण्यासाठी भारताला पुढील २० ते ३० वर्षे ७ ते १० टक्के शाश्र्वत वाढ राखणे आवश्यक आहे. फार कमी राष्ट्रांना ही कामगिरी साध्य करणे शक्य झाले आहे अशा इशारा आयोगाने दिला आहे. ज्या देशांचे २०२३मधील दरडोई वार्षिक उत्पन्न १४,००५ डॉलर असेल त्यांची गणना जागतिक बँकेने उच्च-उत्पन्न गटांमध्ये केली आहे.

## आजपासून ३१ जुलैपर्यंत

११४२२ सोलापूर-पुणे ऊत्र्वण, ११४२१ हडपसर-सोलापूर ऊत्र्वण, १२१६९/१२१७० पुणे-सोलापूर ४०१९ एक्सप्रेस दौंड-निजामाबाद ऊत्र्वण, ११४१८ सोलापूर-पुणे एक्सप्रेस, ०१५२१ दौंड-बारामती ऊत्र्वण, ०१५२२ हडपसर-दौंड ऊत्र्वण, ०१५२६ बारामती-पुणे ऊत्र्वण, ०१५२५ बार पुणे-दौंड चएचण पॅसेंजर, ०१५२५ बारामती ऊत्र्वण, ०१५२५ ०१५२७ दौंड-बारामती डीएमयू, ०१५२९/०१५३० पुणे-दौंड-पुणे, ०१५२८ बारामती-पुणे डीएमयू, ०१४६२/०१४६१ दौंड-सोलापूर-दौंड डीएमयू, ०१५३३ पुणे-दौंड डीएमयू, आणि ०१४४८/ ०१४८८ पुणे-हरंगुळ-पुणे स्पेशल या गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत.

३१ जुलै रोजी रद्द करण्यात आलेल्या गाड्या?

११४१७ पुणे-सोलापूर एक्सप्रेस, १७६१४ हजूर साहिब नांदेड एक्सप्रेस, १७६१३ पनवेल-हजूर साहिब नांदेड एक्सप्रेस, ११४२२ सोलापूर-पुणे ऊत्र्वण, १२१६९/१२१७० पुणे-सोलापूर-पुणे एक्सप्रेस, ११४०६ अमरावती-पुणे, ११४०६ अमरावती-पुणे, ११४०६ अमरावती-पुणे, १९९९ ११४१८ सोलापूर-पुणे एक्सप्रेस, ०१५२१ दौंड-बारामती ऊत्र्वण, ०१५२२ हडपसर-दौंड ऊत्र्वण, ०१५२६ बारामती-पुणे ऊत्र्वण, ०१५२५ पुणे-दौंड मेमू पॅसेंजर, ०१५१२ बारामती-दौंड-दौंड-बारामती ०१५२५ ऊत्र्वण, ०१५२९/०१५३० पुणे-दौंड-पुणे, ०१५२८ बारामती-पुणे डीएमयू, ०१४६२/०१४६१ दौंड-सोलापूर-दौंड डीएमयू, ०१५३३ पुणे-दौंड डीएमयू, आणि ०१४८७/ ०१४८८ विशेष. सोलापूर, पुणे या मार्गावर नॉन इंटरलॉकिंग अन् ट्रॅफिक ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळं रेल्वे गाड्या बंज ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मध्य रेल्वेच्या पुणे विभागातील दौंड रेल्वे स्थानक, दौंड कार्ड लाईन, दौंड गुड्स यार्ड आणि दौंड ए केबीन दरम्यानहा ब्लॉक घेण्यात येणार असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे. यामुळं पुण्याला जाणाऱ्या गाड्यावर सर्वात जास्त परिणाम होणार आहे. दरम्यान, तुम्ही जर या रेल्वे गाड्यांमधून प्रवास करणार असाल तर तुम्हाला तुमच्या ट्रेन्सची माहिती असणे गरजेचे आहे. त्यामुळं प्रवास करण्यापर्वी रेल्वेचं वेळापत्रक तपासा आणि मगच घराबाहेर पडा, अन्यथा त्रासाला सामोरं जावं लागेल.


## पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताचं

२२ वर्षांची मून भाकर ही मूळची हरियाणातल्या झज्जर तालुक्याची आहे. मनू भाकरने आपल्या नेमबाजी करिअरमध्ये आतापर्यंत चांगली कामगिरी केली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरही तिने आपला ठसा उमटवलेला आहे. अशातच आता ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकल्याने मनू भाकरने सर्वांची मनं जिंकली आहे. २०२१ मध्ये टोकियो ऑलिम्पिकमधील पात्रतेमध्ये पिस्तुलमधील बिघाडानंतर मनू स्पर्धेतून बाहेर पडली होती.

काय म्हणाली मनू भाकर?

पदक जिंकल्यानंतर मनू भाकर बोलताना म्हणाली, ही फार वेगळी भावना आहे, जी मी शब्दात व्यक्त करू शकत नाही. पदक जिंकल्याचा मला प्रचंड आनंद आहे. हे पदक माझ्या एकटीचं नसून ही टीमची मेहनत आहे. मला या ठिकाणी पाठिंबा देण्यासाठी आलेल्या भारतीयांचे मी आभार मानते. हे भारताचं पहिलं पदक आहे आणि भारत या ऑलिम्पिकमध्ये अजून पदकांची कमाई करेल याची मला खात्री आहे. दरम्यान, पाच शॉट्सच्या पहिल्या राउंडला ५०.४ शूट करून दुसरे स्थान पटकावलं. मात्र दुसर्या राउंडमध्ये तिने प्रत्येकी ५ शॉट्सच्या दोन मालिकेनंतर एकूण १००.३ अंक मिळवले. त्यानंतर अखेरपर्यंत तिने झुंज दिली अन् पहिल्या तिन्ही स्थानावर आपली पकड मजबूत केली. तुम्हाला विश्र्वास बसणार नाही पण, मनू भाकरचं रौप्यपदक केवळ ०.१ पॉईंटने हुकलं.

## टाकळीवाडीच्या एकाच वेळी तिघांची पोलीस व नेव्ही मध्ये निवड




पत्रकार नामदव निमळे

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील एकाच वेळी तिघांची निवड झालेली आहे. त्यामध्ये सुमित आप्पासो कोथळी (महाराष्ट्र पोलीस), सम्मेद बाहुबली पाटील (महाराष्ट्र सुरक्षा बल) तसेच सिद्धार्थ जितेंद्र कोथळी (इलेक्ट्रो टेक्निकल ऑफिसर नेव्ही) मध्ये निवड झालेली आहे. गावामध्ये यांचे कौतुक होत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# लायन्स क्लब ही सेवाभावी संस्था : आ. सचिन कल्याणशेट्टी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः लायन्स क्लब ही सेवाभावी संस्था असून गेल्या अनेक वर्षापासून लायन्सचे कार्य कौतुकास्पद आहे. लायन्स क्लब संचलित शाळेचा मी विद्यार्थी असून लायन्स क्लब व शाळेस आवश्यक ते सहकार्य मी करेन अशी अशी ग्वाही आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली.



अक्कलकोट येथील लायन्स क्लबच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण समारंभ लोकापुरे मंगल कार्यालयात संपन्न झाला. याप्रसंगी आमदार कल्याणशेट्टी बोलत होते. प्रधान अधिकारी म्हणून डॉ.व्यंकटेश यजुर्वेदी हे उपस्थित होते. याप्रसंगी रिजन चेअरमन राहुल जोशी,झोन-२ चेअरमन नंदिनी जाधव,डॉ.अरुण परिचारक आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पाहुण्यांचे स्वागत मावळते सचिव गौरीशंकर चनशेट्टी यांनी स्वागत केले.

प्रास्ताविक व अहवाल वाचन मावळते अध्यक्ष सिध्दया मठ यांनी केले. यावेळी नूतन अध्यक्ष शिवानंद नंदर्गी,सचिव सुधीर माळशेट्टी, खजिनदार सुनील बिरादार,प्रथम उपाध्यक्ष अभय खोबरे,द्वितीय उपाध्यक्ष चेतन जाधव,तृतीय उपाध्यक्ष कल्याणी आळगी,विठ्ठल तेली,डॉ.विवेक करपे,संतोष शिरोळे महिबूब सलगरकर,राजेंद्र कारीमुंगी,कमल अल्लोळी,शहीद वळसंगकर, शिवपुत्र हळगोदे,राजशेखर हिप्परगी,शिरीष पंडित, बाबासाहेब निंबाळकर,मल्लिकार्जुन मसुती,गौरीशंकर चनशेट्टी आदीसह संचालक मंडळाला शपथ प्रदान करण्यात आली. नूतन अध्यक्ष नंदर्गी यांनी वर्षभरात माझ्या कार्यकाळात अनेक समाजोपयोगी कामे मी लायन्सच्या माध्यमातूनकरणार असल्याचे मनोगतात सांगितले.

डॉ.यजुर्वेदी यांनी आरोग्याविषयी काही टिप्स आपल्या मनोगतातून देऊन लायन्स क्लबच्या कार्याविषयी माहिती दिली. या कार्यक्रमास लायन्स क्लब संचलित शाळेचे चेअरमन राजेंद्र हत्ते, प्रभाकर मजगे, मल्लिनाथ साखरे,डॉ.प्रदीप घिवारे,सुभाष गडसिंग चंद्रकांत वेदपाठक,प्रकाश उन्नद,शिवशरण खुबा,अभिनंदन गांधी, सुभाष खमीतकर आदींसह माजी नगराध्यक्ष बसलिंगप्पा खेडगी, ॲड.अनिल मंगरुळे,विलास कोरे,अतुल कोकाटे,राजेश निलवाणी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष गडसिंग यांनी केले तर आभार सुधीर माळशेट्टी यांनी मानले.

# अनंत चैतन्य प्रशाला, हन्नूर येथे विविध उपक्रमाने शिक्षण सप्ताहाची सांगता

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, तो आत्मनिर्भर बनावा आणि त्यासोबतच त्याने वृक्षसंवर्धन, पर्यावरण,जैवविविधता, जल संरक्षण यासारख्या विविध शासकीय उपक्रमात सहभागी होवून एक सुजाण नागरिकत्वाचे कर्तव्य पार पाडत त्याने देश विकासात हातभार लावावा याकरिता गेले सात दिवस सुरू असलेल्या शिक्षण सप्ताह या शासनाच्या महत्वकांक्षी योजनेचा सांगता समारंभ




आज रविवार दिनांक २८ जुलै २०२४ रोजी महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य व कनिष्ठ महाविद्यालय हन्नूर येथे विविध उपक्रमाने संपन्न करण्यात आला. सुरुवातीला प्रशालेच्या वतीने शाळांचे सक्षमीकरण ,शाळा व समाज यामध्ये संबंध प्रस्थापित करण्याबरोबरच समाजातील विविध घटकांमध्ये शाळे विषयी उत्तरदायित्त्व निर्माण करणे हा विद्यांजली पोर्टलचा मुख्य हेतू असल्याने प्रशालेत शालेय स्वंयसेवक कार्यक्रम घेण्यात आले व यात स्वयंस्फूर्तीने सहभागी होणाऱ्या, शाळेला मदत करणाऱ्या सदस्यांची नांवे शालेय फलकावर लिहिण्यात आले. यावेळी प्रशालेचे जेष्ठ शिक्षक श्री.शहाजी माने यांनी विद्यांजली कार्यक्रमाविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.यानंतर पर्यावरणपूरक वातावरण निर्मिती व जनजागृती करण्याकरिता गावातून प्रभात फेरी काढण्यात आली. या कार्यक्रमास अनुसरून प्रशालेच्या वतीने घोष्यवाक्य पोस्टर स्पर्धा घेण्यात आली. कला महाविद्यालयाच्या व प्रशालेच्या मुलां-मुलींनी या स्पर्धेस भरभरून प्रतिसाद दिला.यासोबतच पौष्टिक आहार स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते.यात पाचवी ते दहावीच्या मुलां- मुलींनी सक्रिय सहभाग नोंदवत कुणी ढोकळा,इडली,अप्पे,मोड आलेली कडधान्ये तर कुणी शेंगालाडू,डिंकलाडू,खीर,लाफशी, ड्रायफुट युक्त शिरा,सलाड असे विविध प्रकारचे उष्मांक वाढवणारे पदार्थ व मिष्टान्न बनवून आणले होते.या स्पर्धेला उत्तम प्रतिसाद देत विद्यार्थ्यांनी स्नेह भोजनाचा मनमुराद आनंद लुटला.यावेळी प्रशालेचे सेवानिवृत्त लिपिक श्री.अब्दुलकरीम मुल्ला यांनी सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या कडून केळी वाटप केले. प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे यांनी त्यांचे आभार मानले. यावेळी पर्यवेक्षक श्री. ज्ञानदेव शिंदे, श्री. धनंजय जोजन,प्रा.रविंद्र कालीबत्ते, श्री. सरदार मत्तेखाने, श्री.अब्दुल अझीझ मुल्ला, श्री.स्वामीनाथ कोरे,शिक्षिका सौ. मृदुलादेवी स्वामी, सौ. मल्लम्मा चप्पळगाव, सौ. स्वप्नाली जमदाडे व विद्यार्थी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहकार्याने विधानसभा निवडणुकीत उतरणार : महेश डोंगरे

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः आगामी करमाळे विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहकार्यामुळे मी निवडणुकीत उभा राहणार आहे याची माहिती मराठा क्रांती ठोक मोर्चा चे समन्वयक महेश डोंगरे यांनी दिले आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहकार्यामुळे मी तालुक्यात नव्हे तर महाराष्ट्रात अनेक कामे केली आहेत त्यामुळे त्यांच्या सहकार्यामुळे महाराष्ट्रात पुन्हा शिवसेनेचे सत्ता येणार आहे करमाळा विधानसभेची जागा शिवसेनेचे आहे पूर्वी अनेक शिवसेनेचे आमदार या ठिकाणी निवडून आले आहेत त्यामुळे इथे शिवसेनेचाच उमेदवार असणार आहे आता लवकरच करमाळा तालुक्यात दौरा करणार आहे नागरिकांच्या अडचणी समजून भविष्यात सोडवण्याचा प्रयत्न करणार आहे अशी माहिती मराठा क्रांती ठोक मोर्चाचे समन्वय महेश डोंगरे यांनी दिली आहे





# श्री गुरुदत्त शुगर्स वरील पूरग्रस्त छावणीला शासकीय अधिकारी यांची भेट

पत्रकार नामदेव निर्मळे

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील श्री गुरुदत्त शुगर्स कारखान्यावरील पूरग्रस्त छावणीला इचलकरंजीच्या प्रांताधिकारी मोसमी चौगुले बेर्डे, शिरोळचे तहसीलदार अनिलकुमार हेळकर, यांनी पूरग्रस्त छावणीला भेट दिली. माणुसकी हाच धर्म मानून समाजसेवेत अग्रेसर नेहमी श्री गुरुदत्त शुगर्स असतो. शासकीय अधिकारी भेट दिल्यामुळे अनेकांच्या चेहऱ्यावर हसू म्हटले. पूरग्रस्तांना लागेल ती मदत देण्याची आश्र्वासन देण्यात आले. शासकीय अधिकारी यांनी श्री गुरुदत्त शुगरचे आभार मानले आहे.

# गावात रस्ते रस्त्यात खड्डे खड्ड्यात नाल्या मग कसे असेल गाव



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

बुलढाणा/राहुल साबळे : सिंदखेड राजा तालुक्यातील सोयंदेव खैरखेड गट ग्रामपंचायत असलेले खैरखेड गावातील रस्ते प्रचंड खराब झाले असून. त्याकडे ग्रामपंचायत चे उघडझाप दुर्लक्ष दिसत आहे. नाल्यांची साफसफाई नाही . नाल्यांचे पाणी रस्त्यावर साचलेले आहे. रस्त्यावर सारा चिखलच चिखल झाल्याने गावातील नागरिकांमध्ये प्रशासनाबद्दल संतापाची लाट उसळली आहे. खैरखेड गावातील नागरिक रस्त्यातील खड्ड्यांमुळे आणि चिखलामुळे खूपच संतप्त झाले आहेत. गावाच्या रस्त्यांची परिस्थिती अतिशय खराब आहे आणि नाल्यां चिखलाने भरलेली आहे. नागरिकांना या समस्यांमुळे दैनंदिन जीवनात खूप त्रास सहन करावा लागत आहे. ग्रामपंचायतने लवकरात लवकर ही समस्या सोडवावी अशी नागरिकांची मागणी आहे. परिणामी रस्त्यावर साचलेल्या पाण्यात डास अंडी घालत आहे त्यामुळे मच्छरांची संख्या ही दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यामुळे गावातील लोकांच्या आरोग्याला हानिकारक आहे. ग्रामप्रशासनाने गावकऱ्यांच्या जिवाशी खेळ खेळु नये असे गावकऱ्यांनी सांगितले आहे.

# उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत आरोग्य शिबिर

**दैनिक यशसिध्दि न्यूज**



पंढरपूर/प्रतिनिधीः महाराष्ट्र राज्याची उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष दीपक आबा साळुंखे पाटील युवा नेते यशराज साळुंखे पाटील आवर्जून उपस्थित राहणार असल्याची माहिती दिगंबर सुडके यांनी दिली आहे. सोमवारी होणारे या शिबिरात मोफत आरोग्य तपासणी डोळे तपासणी. औषध वितरण. चष्मे वाटप करण्यात येणार आहे.यावेळी उपजिल्हा रुग्णालय पंढरपूरचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर महेश सूडके तालुका वैद्यकीय अधिकारी डॉक्टर एकनाथ भोसले यांची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमात सोमवार दिनांक २९ रोजी वेळ सकाळी दहा वाजून ते सायंकाळी पाच वाजेपर्यंतविठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती भक्त निवास गाळा क्रमांक ४६. भक्ती मार्ग पंढरपूर येथे होणार आहे. यावर शिबिरासाठी पंढरपुरातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आव्हान आयोजक पंढरपूर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष दिगंबर सुडके यांनी केले आहे

# माजी विद्यार्थ्यातर्फे प्रशालेस नेहमी सहकार्य असेल: यशवंत धोंगडे

## अक्कलकोट येथील श्री शहाजी हायस्कूलच्या १९७९ च्या बॅचतर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः प्रशालेतील गरजू व गरीब विद्यार्थी शैक्षणिक साहित्य नसल्याने शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी आमच्या १९७९ च्या बॅचतर्फे प्रशालेतील गरजू व गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करीत आहोत. भविष्यात विद्यार्थ्यांना व श्री शहाजी हायस्कूल प्रशालेस माजी विद्यार्थी नेहमी सहकार्य करतील असे प्रतिपादन मराठा मंदिर श्री शहाजी हायस्कूलच्या १९७९ च्या बॅचचे माजी विद्यार्थी व माजी उपनगराध्यक्ष यशवंत धोंगडे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक शिवाजी शिंदे हे होते.

येथील मराठा मंदिर श्री शहाजी हायस्कूल या प्रशालेच्या १९७९ च्या बॅचचे माजी विद्यार्थ्यांनी प्रशालेतील गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी एक हजार वह्या व १७ हजार रुपयांचे इयत्ता नववी व दहावीतील विद्यार्थ्यांसाठी क्रमिक पुस्तके दिली होती. या शैक्षणिक साहित्यांच्या वितरण कार्यक्रमात माजी विद्यार्थी धोंगडे हे बोलत होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य शिवाजी भांगरे व स्वागत मुख्याध्यापक शिवाजी शिंदे यांनी केले. १९७९ च्या बॅचचे माजी विद्यार्थी सरोजा घनाते,रेणुका जोशी,शशिकला नामसेवी, मीनाक्षी पाटील,वर्षा सातवेकर, अंजुली शहा,के व्ही कुलकर्णी, डी.व्ही.पाटील, मल्लिनाथ तानवडे,प्रवीण शहा,सविता गांधी,जाफर जमादार,चांदबाशा मनुरे,मिलिंद सरदेशमुख,व्यंकट सावळे,सिद्धेश्र्वर खुबा,राजेंद्र लिंबीतोटे,निलपरी येळमेली,मंजू हर्डीकर माधुरी हर्डीकर,सोमनाथ माळशेट्टी,सुनंदा गायकवाड,यशवंत धोंगडे, शिवपुत्र घटकांबळे, अक्कलकोट कॉलेजचे प्राचार्य डॉ.एस.सी. आडवीतोटे,माणिक साळुंखे आधी उपस्थित होते. याप्रसंगी गरीब कर्ज विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप माजी विद्यार्थी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मिलिंद सरदेसाई यांनी माजी विद्यार्थ्यांतर्फे मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास प्रशालेतील सहशिक्षक स्वाती माळवदकर, रूपाली जाधव,अर्चना गायकवाड,मानसी जाधव,विजय बुद्रुक, सायबन्ना धनशेट्टी,शिवानंद कोष्टी,सतीश जगदाळे, अरविंद शिंदे,चेतन जाधव,नंदकुमार सूर्यवंशी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानसी जाधव यांनी तर आभार प्रदर्शन शिवाजी भांगरे यांनी केले.



# अन्नछत्र हे आम्हा अमरावतीकरांचे श्रद्धेय : यशोमतीताई ठाकूर

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेले अन्नछत्र हे आम्हा अमरावतीकरांचे श्रद्धेय असल्याचे मनोगत तिवसा विधानसभा क्षेत्र अमरावतीचे आमदार व माजी मंत्री यशोमतीताई ठाकूर यांनी व्यक्त केल्या. ते टीम तिवसा यांना श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात घेऊन आल्या असता न्यासाचे सचिव शामराव मोरे काका यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी त्या बोलत होत्या. यावेळी प्रवीण देशमुख, न्यासाचे पुरोहित संजय कुलकर्णी, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, शरद भोसले, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, महांतेश स्वामी, शिव स्वामी, एस.के. स्वामी, धनंजय निंबाळकर, तानाजी पाटील, अनिल बिराजदार, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, विठ्ठल रेड्डी, विश्र्वनाथ कलशेट्टी, खंडेराय होटकर यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# पुणे सोलापूर महामार्गावरील सावळेश्वर शेटफळ येथील अंडर बायपासचा प्रश्न संसदेत खासदार प्रणिती शिंदे

## यांच्या प्रयत्नांना गडकरींचा सकारात्मक प्रतिसाद

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः खादर पनीती शिंदे यांनी सोलापूर पुणे महामार्गावरील जिल्ह्यातील शेटफळ आणि सावळेश्र्वर येथे उड्डाणपूल व अंडर बायपास करणे आणि जिल्ह्यातून जाणाऱ्या इतर महामार्गांची देखभाल व दुरुस्ती वेळेवर करण्यासंदर्भात



संसदेच्या अधिवेशनामध्ये प्रश्न्न उपस्थित केला आहे त्या केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद सोलापूर शहर व जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय महामार्गाचे जाळे पसरली आहे या राष्ट्रीय महामार्गामुळे अनेक गाव महामार्गाला जोडली गेली आहेत मात्र या महामार्गाचे काम होत असताना किती गावांमध्ये अंडरपास करण्यात आले नाहीत

त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे प्रामुख्याने सोलापूर जुना महामार्ग वरील शेटफळ येथे अंडरपास आणि सावळेश्र्वर गाव येथे उड्डाणपूला अथवा अंडरपास नसल्यामुळे नागरिकांची मोठ्या घरचे होत असून वाहतुकासही अडथळा निर्माण होत आहे

# गिरवी–गणेशगाव बंधाऱ्याची तातडीने दुरुस्ती करावी : हर्षवर्धन पाटील

## बंधाऱ्याला भगदाडाची तिसरी वेळ!

**दैनिक यशसिध्दि न्यूज**



इंदापूर/अतुल सोनकांबळे : नीरा नदीवरील गिरवी–गणेशगाव येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याच्या भरावास पुराच्या पाण्याने शुक्रवारी (दि. २६) भागदाड पडले आहे. परिणामी, शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाने या बंधाऱ्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी केली आहे. या बंधाऱ्याला भरावास पुराच्या पाण्याने भगदाड पडण्याची ही तिसरी वेळ आहे. त्यामुळे शेतकऱ्याचे नुकसान होत आहे. निरेला आलेल्या पुराच्या पाण्याने गिरवी गावच्या बाजूला मोठे भगदाड पडले आहे. त्यामुळे इंदापूर तालुक्यातील गिरवी गावातून माळशिरस तालुक्यातील गणेशगाव कडे होणारे दळणवळण बंद पडले आहे. जर या बंधाऱ्याच्या भगदाडाची तातडीने दुरुस्ती केली नाही, तर मात्र हा बंधारा पाण्याभोवी कोरडा राहिल्यास बंधाऱ्याच्या पाण्यावर अवलंबून असणारी इंदापूर व माळशिरस तालुक्यातील पिके धोक्यात येणार आहेत. त्यामुळे जलसंपदा विभागाने तातडीने बंधाऱ्याच्या भगदाडाची दुरुस्ती करावी, अशी सूचना हर्षवर्धन पाटील यांनी केले आहे.

# सुपतगाव शाळेत शिक्षण सप्ताह उत्साहात साजरा




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

उमरग/प्रतिनिधीः महाराष्ट्र शासन शिक्षण विभागाकडून २२ जुलै ते २८ जुलै या कालावधीत सर्व शाळांना 'शिक्षण सप्ताह ' राबविण्याचे आदेश देण्यात आले होते. त्या निमित्ताने उमरगा तालुक्यातील सुपतगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षण सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने शालेय शिक्षण विभागाच्या आदेशानुसार यावेळी वेगवेगळ्या शैक्षणिक साहित्याचा वापर करून शिक्षक शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा कृतीयुक्त सहभाग करून अध्ययन अध्यापनाला सुरुवात केली सांख्यिकी भाषा ओळखणे, शब्दकोडे, व्याकरणाचे धडे, विद्यार्थ्यांनी शाळेत शैक्षणिक साहित्य व भाषा विषयावर आधारित घोषवाक्य लिहिलेले पोस्टर तयार करणे दुसर्या दिवशी सर्वप्रथम निपुण प्रतिज्ञा व मूलभूत संख्याज्ञान व साक्षरता दिवस या अंतर्गत भाषिक खेळ गणितीय खेळ गणित तज्ञाच्या गोष्टीचे आयोजन भौमितिक आकृत्यांच्या रांगोळी व पोस्टर निर्मिती तयार करण्यात आली.तसेच विविध खेळांचे आयोजनसुद्धा करण्यात आले होते.

विदयार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा म्हणून सांस्कृतीक कार्यक‘माचे आयोजन करण्यात आले यावेळी लोकगीते, कोळीनृत्य, दांडीया नृत्य, भावगीत, भाषणस्पर्धा, गीतगायन स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी सर्व विद्यार्थ्यांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन मुख्याध्यापक जी. एम. कबाडे, शिक्षक,व्ही.जी.बनसोडे, एम एस सोळशे, जे.एस. दलाल,राजेंद्र सूर्यवंशी, नागनाथ बनसोडे,शालेय समितीचे सर्व पदाधिकारी, गावातील शिक्षण प्रेमी नागरिक, संतोष विभुते, ज्ञानेश्र्वर गुरव, सुधाकर हेंडले, राजेंद्र लामजणे, यांच्यासह गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# वडिलांच्या अंत्यविधीला मुलांनीच दिला नकार, वृद्धाश्रमातील ही घटना डोळ्यात आणेल पाणी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पोखरापूर/प्रतिनिधीः कुणाचं कितीबी वैर असू द्या, पर मेल्यावर समद संपतं, असे जुनी जाणकार वयोवृद्ध म्हणायचे. आजही त्यांनी दिलेल्या या संस्कारांची शिदोरी अनेकजण जपण्याचा प्रयत्न करताना दिसतात. पण मोहोळ तालुक्यातील मोरवंची येथील वृद्धाश्रमात घडलेल्या एका घटनेने मात्र संस्कारीक पिढीबद्दल न बोललेलेच बरं असे म्हणण्याची वेळ आली आहे. वृद्धाश्रमात असलेल्या ७६ वर्षीय वडिलांच्या अंत्यविधीला यायलाच त्यांच्या दोन पोरांनी चक्क नकार देत वृद्धाश्रमानेच अंत्यविधी करावा, असे लिहूनही दिले. याबाबत अधिक माहिती अशी की, मोहोळ तालुक्यातील मोरवंची येथे असलेल्या वृद्धाश्रमात एक वर्षांपूर्वी कौटुंबिक कलहामुळे घराबाहेर काढलेल्या वयोवृद्ध आजोबांना ग्रामस्थांनी आणून सोडले होते. वर्षभरामध्ये अनेक शारीरिक व्याधींचा सामना करत आजोबा कसेबसे राहिले.

वृद्धाश्रमातील इतर सहकाऱ्यांमध्ये मन रमवायचा प्रयत्न करत होते. त्यातच काही महिन्यांपूर्वी त्यांना हृदयविकाराचा धक्का आला. वृद्धाश्रमातील प्रशासनाने त्यांना तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात नेले. त्यावेळी त्यांच्या दोन्ही मुलांना याबाबतची माहिती देण्यात आली. माहिती देऊनही त्या आजोबांना पाहायला कोणीही गेले नाही. उपचारानंतर ते आजोबा परत वृद्धाश्रमात दाखल झाले. त्यानंतर पुन्हा दि. २३ जुलै २०२४ रोजी त्यांना हृदयविकाराचा धक्का बसला. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. पुन्हा वृद्धाश्रम प्रशासनाने त्यांच्या दोन्ही मुलांना याबाबतची माहिती दिली. परंतु, दोन्ही मुलांनी त्यांना घेऊन जाण्याबाबत तसेच अंत्यविधी करणेबाबत सकारात्मकता दाखवली नाही. अखेर ग्रामस्थांनी कसेबसे एका मुलाला वृद्धाश्रमात आणून त्याच्याकडून त्या आजोबांच्या अंत्यविधीची लेखी संमती घेतली. अत्यंत जड अंतकरणाने वृद्धाश्रम प्रशासनाने सोलापूर येथे त्या वयोवृद्ध आजोबांचा अंत्यविधी केला. ते आजोबा जरी अनंतात विलीन झाले असले तरी, कागदोपत्री सुसंस्कृत झालेल्या समाजासमोर आणि वयोवृद्ध पिढीची साथ सोडलेल्या या पिढीसमोर अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. खरंच समाजातील ही संस्कारीत पिढी एवढी निष्ठूर झाली आहे का?

दगडालाही पाझर फुटावा अशा बाप नावाच्या संघर्षाचे झाड तुटले असतानाही तळहाताच्या फोडाप्रमाणे जपलेल्या मुलांना का कशी मायेची माती चिटकली नाही? आयुष्यभर राब राब राबून मुलांना उभे करण्याची धडपड सुरू आहे. त्यातून किमान म्हातारपणी तर मुलांच्या मायेचा आधार मिळेल, या आशेवर बसलेल्या अनेक वडिलांना या घटनेने धक्काच बसला असून इथे ओशाळली माणुसकी अशा प्रकारची भावना व्यक्त केली जात आहे. वाईट वाटलं, निशब्द झालो....

त्या वयोवृद्ध आजोबांच्या मृत्यूची माहिती त्यांच्या दोन्ही मुलांना कळविली. त्यावेळी त्यांनी घेऊन जायला तसेच अंत्यविधीला असमर्थता दाखवली. त्यातील एक मुलगा आला, त्याने आम्हाला संमती लिहून दिली, वडिलांचे अंतिम दर्शनही न घेता तो निघून गेला. वृद्धाश्रमाने जड अंतकरणाने त्या आजोबांवर अंत्यसंस्कार केले. वाईट वाटलं, मुलांनी जन्म दात्यालाच परकं केलं. लय अवघड हाय गड्या, उमगाया बापं रं...ज्याने जग दाखविले, अनंत अडचणीचा सामना करत जगायला शिकवले त्याच मुलांनी वडिलांना परकं केलं. कुटूंब व्यवस्थेच्या नातेसंबंधांमधील सगळ्यात कणखर, कष्टाळू भूमिका वडिलांची डोळयासमोर येते. समाजातील प्रत्येक मुलाला वडील या शब्दाचा अर्थ कळून त्यांच्याबद्दलची तळमळ जाणवत नाही, तोपर्यंत वृद्धाश्रमांचे दरवाजे बंद होणार नाही. नातेसंबंधांमधील कोरडेपणा संपला नाही तर येणाऱ्या काळात कुटूंब व्यवस्थेसमोर मोठा धोका निर्माण होणार आहे यात शंका नाही.

# फवारणी करतेवेळी घ्यावयाची काळजी अंत्री कोळी येथे कृषी सहाय्यक यांचे मार्गदर्शन



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

बुलढाणा/राहुल साबळे :चिखली तालुक्यात व जिल्ह्यात मुबलक पावसामुळे खरीप हंगामातील पिके बहरली आहेत पिकावर आळ्या पोषक वातावरण बऱ्याच प्रमाणात प्रादुर्भाव आढळून येत आहे

किडेने आर्थिक नुकसान पातळीचे उल्लंघन केल्यास रासायनिक कीटकनाशकाची फवारणी करावी मानवी शरीराची रोग प्रतिकार शक्ती अबाधित राखण्यात तसेच भविष्यात कॅन्सर सारखा दुर्धर व जीव घेणे आजारापासून संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांनी पिकावर रासायनिक कीटकनाशकाची फवारणी करताना काळजी घ्यावी असे आव्हान तालुका कृषी अधिकारी चिखली डीबी सवडतकर यांनी केले चिखली मंडळ कृषी अधिकारी श्री दिनेश लंबे यांच्या मार्गदर्शनाखाली आंत्रिकोळी येथील कृषी सहाय्यक सीमा बाहेकर व कृषी पर्यवेक्षक जी. बी. इंगळे यांनी आंत्रिकोळी येथील शेतकरी बांधवांना कीटकनाशक फवारणी करताना घ्यावयाची काळजी या विषयावर मार्गदर्शन केले रासायनिक कीटकनाशके ही विविध जहाल रासायनिक द्रव्याच्या मिश्रणातून बनवलेली असतात मानवी शरीर अशा कीटकनाशकांना अत्यंत संवेदनशील असते कोणतेही काळजी न घेता रासायनिक कीटकनाशकांची फवारणी केल्यामुळे विषबाधा झालेल्या आपण आजूबाजूला दूरचित्रवाणी तसेच वर्तमानपत्रात पाहिल्या आहेत याची पूर्णता टाळण्यासाठी फवारणी करताना शेतकऱ्यांनी कीटकनाशकांच्या शरीराची थेट संपर्क येऊन यासाठी प्रतिबंधकत्मक स्वरूपात कीटकनाशक फवारणी किट मास्क गॉगल टोपी हातमोजे रेनकोट या ड्रेसचा फवारणी करताना वापर करावा शेतात फवारणी करण्यासाठी पूर्वी शेतकरी शेतमजूर यांनी तंबाखू व इतर मादक पदार्थाचे सेवन करू नये शेतात जेवण करण्यापूर्वी हा स्वच्छता फवारणी पंप स्वच्छ धुतलेले असावा शक्यतो दोन किंवा अधिक रा सर कीटकनाशकांचे मिश्रण करण्यात येऊ नये कीटकनाशकांची मिश्रण पंपात टाकताना हाताळू नये ते काढणे हलवून द्यावे मानवी आरोग्यास सुरक्षित व सह उपलब्ध होणारा निंबोळी अर्क दशपर्णी अर्क वापरण्यास प्रथम प्राधान्य द्यावे आणि विद्यापीठ कृषी विज्ञान केंद्र यांनी दिलेले शिफारशीचे प्रमाणशीर पद्धतीने कीटकनाशके वापरावीत अन्यथा त्याचे अवशेषीय धान्य कडधान्य फळे भाजीपाला यांचे माध्यमातून पुढे अन्नसाखळीत संमिश्र इत होतात वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने फवारणी करूनही रासायनिक कीटकनाशके व त्यांना रिकामे डबे शेतात एक गड्डा करून बाजूला टाकावे जेणेकरून त्याची मानवी संपर्क येणार नाही घरी आल्यानंतर फवारणीचे कपडे त्वरित स्वच्छ धुऊन आंघोळ करावी शेतकऱ्यांनी आपले शेतातील शेतमजुरास फवारणी करण्यासाठी आवश्यक ती साधने पूर्वीत याची काळजी सर्वांनी ची जबाबदारी संबंधित शेतकऱ्यांनी घ्यावी सदर मार्गदर्शन करतेवेळी गावातील शेतकरी बांधव व ग्रामस्थ उपस्थित होते




# निफाडला विधानसभा युवक काँग्रेस तर्फे चलो पंचायत चलो वॉर्ड अभियानास सुरुवात

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या चलो वार्ड चलो पंचायत अभियानाची सुरुवात निफाड येथे रविवार दिनांक २८ जुलै रोजी सुरुवात करण्यात आली.उत्तर महाराष्ट्र युवक काँग्रेसचे प्रभारी एहसानजी खान यांच्या हस्ते अभियानाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी नाशिक जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष गौरव पानगव्हाणे व निफाड युवक काँग्रेसचे अध्यक्ष सचिन खडताळे यांनी यावेळी अभियाना संदर्भात मार्गदर्शन केले.

प्रत्येक वॉर्डातील व पंचायती मधील समस्या यांची माहिती घेऊन ती भरून घेण्यात आली.

याप्रसंगी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विनायक शिंदे, माजी नगरसेवक आरिफ मणियार,शहराध्यक्ष स्वप्नील बिनायकिया, नंदकिशोर कापसे, तालुका उपाध्यक्ष अलीभाई शेख, तालुका संघटक शेरखान मुलाणी, निफाड शहर युवक काँग्रेस अध्यक्ष दिनेश कापसे, खालकर भीमराज साळुंखे, राकेश निकाळे, विकास खडताळे, आरिफ अन्सारी, दीपक शिंदे,गौतम वानखेडे, सिद्धार्थ साळवे,दुर्योधन गांगुर्डे,विशाल साळवे ,आकाश जगताप,सागर इप्परदास,सागर धुमाळ,राहुल साळवे,रितेश मोरे,राहुल पगारे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## जाहीर प्रसिध्दीकरण

जा.क्र.२०२४/अभिलेख/कावि/५६०/२०२४
दि.२२/०७/२०२४

प्रति;

**श्री.म.इसाक नबिलाल बागवान**
रा.सलगर ता.अक्कलकोट } **अर्जदार**

**विरुध्द**

**जन्म मृत्यू नोंदणी,कार्यालय**
नगरपरिषद सलगर ता.अक्कलकोट } **सामनेवाले**

ज्याअर्थी यातील म.इसाक नबिलाल बागवान ता.अक्कलकोट जि.सोलापूर यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा जन्म दि.०१/०६/१९५९ रोजी मौजे सलगर ता.अक्कलकोट येथील राहत्या घरी झाला आहे. परंतू माझ्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यानी त्यांच्या जन्माची नोंद करुन म.इसाक नबिलाल बागवान या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म–मृत्यू नोंदणी(दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३(२)(३) प्रमाणे मा.तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दिनांक ०७/०३/२०२४ अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणजे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतःअथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचीही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जांची चौकशी होऊन अर्जदारास संबंधित दाखला देण्यात येईल.

हे आज दि.२६/०७/२०२४ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले असे.

शिक्का
**सही**
तहसीलदार अक्कलकोट

## जाहीर प्रसिध्दीकरण

जा.क्र.२०२४/अभिलेख/कावि/५६१/२०२४
दि.२८/०७/२०२४

प्रति;

**श्री.बाबूलाल नबिलाल बागवान**
रा.सलगर ता.अक्कलकोट } **अर्जदार**

**विरुध्द**

**जन्म मृत्यू नोंदणी,कार्यालय**
नगरपरिषद सलगर ता.अक्कलकोट } **सामनेवाले**

ज्याअर्थी यातील बाबूलाल नबिलाल बागवान ता.अक्कलकोट जि.सोलापूर यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा जन्म दि.२२/०९/१९६८ रोजी मौजे सलगर ता.अक्कलकोट येथील राहत्या घरी झाला आहे. परंतू माझ्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यानी त्यांच्या जन्माची नोंद करुन बाबूलाल नबिलाल बागवान या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म–मृत्यू नोंदणी(दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३(२)(३) प्रमाणे मा.तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दिनांक ०७/०३/२०२४ अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणजे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतःअथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचीही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जांची चौकशी होऊन अर्जदारास संबंधित दाखला देण्यात येईल.

हे आज दि.२६/०७/२०२४ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले असे.

शिक्का
**सही**
तहसीलदार अक्कलकोट

## जाहीर प्रसिध्दीकरण

जा.क्र.२०२४/अभिलेख/कावि/५६२/२०२४
दि.२६/०७/२०२४

प्रति;

**श्री.सलीमाबी नबिलाल बागवान**
रा.सलगर ता.अक्कलकोट } **अर्जदार**

**विरुध्द**

**जन्म मृत्यू नोंदणी,कार्यालय**
नगरपरिषद सलगर ता.अक्कलकोट } **सामनेवाले**

ज्याअर्थी यातील सलीमाबी नबिलाल बागवान ता.अक्कलकोट जि.सोलापूर यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा जन्म दि.०१/०१/१९४९ रोजी मौजे सलगर ता.अक्कलकोट येथील राहत्या घरी झाला आहे. परंतू माझ्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यानी त्यांच्या जन्माची नोंद करुन बाबूलाल नबिलाल बागवान या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म–मृत्यू नोंदणी(दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३(२)(३) प्रमाणे मा.तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दिनांक १४/०७/२०२४ अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणजे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतःअथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचीही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जांची चौकशी होऊन अर्जदारास संबंधित दाखला देण्यात येईल.

हे आज दि.२६/०७/२०२४ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले असे.

शिक्का
**सही**
तहसीलदार अक्कलकोट